Order
Read and Recorded

CJJD, Radhangari
23-2-26



Exh. 16/D

RAJENDRA DHANAJI SHINDE Digitally signed by RAJENDRA DHANAJI SHINDE Date: 2026.02.23 17:30:21 +0530

रे. क. नं. १२/२०२६

राधानगरी येथील मे. दिवाणी न्यायाधिशसो

यांचे कोर्टात..................

एकनाथ विठ्ठल पाटील ... वादी

विरुध्द

श्री. कृष्णात गंगाराम रेपे ... प्रतिवादी

**यातिल प्रतिवादी क्र. १ व ५ तर्फे वादीचे मनाई अर्जास म्हणणे खालील प्रमाणे,**

१. वादीचा मनाई अर्ज साफ खोटा व चुकीचा असून सदरील मनाई अर्जातील मजकूर प्रतिवादी यांना मान्य व कबूल नाही. तसेच वादीचा दावा व मनाई अर्ज कायद्यातील तरतुदी प्रमाणे आहे त्या स्वरुपात चालणेस पात्र नाही. सबब वादीचा मनाई अर्ज खर्चासह नामंजुर करणेत यावा.

२. मनाई अर्जी कलम (१) मधील वादीनी कथन केलेले दावा मिळ्कतीचे वर्णन साफ खोटे व चुकीचे असुन त्यामधील मजकुर प्र. वादी यांना मान्य व कबुल नाही. वादी नमुद करतात त्या प्रमाणे वादी यांचे नावे दावा मिळ्कत नाही. सबब वादी यांचा मनाई अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा. तसेच मा. तहसिलदार सो. राधानगरी यांनी क्र. आर.टी.एस./रस्ता मागणी १४३/एस आर- ०४/२०२५ चे कामी ता.२२/१२/२०२५ इ. रोजी केलेला आदेश कायदेशिर व बरोबर आहे सदरील आदेश यातील वादी यांनी अध्याप मा. उपविभागिय अधिकारी सो राधानगरी यांचेकडे अव्हानित केलेला नाही. तसेच मा. तहसिलदार सो. राधानगरी यांनी क्र. आर.टी.एस. /रस्ता मागणी १४३/एस आर- ०४/२०२५ चे कामी ता.२२/१२/२०२५ इ. रोजी केलेल्या आदेशाविरुध्द मे. कोर्टात दाद मागणेचा वादी यांचा अधिकार नाही.

३. वादी यांनी त्यांचे मनाई अर्जी कलम २ मध्ये कथन केलेला मजकुर साफ खोटा व चुकीचा असुन दावा अर्जी कलम १ मध्ये नमुद केलेल्या मिळ्कतीपैकी अ. न. १ ची मिळ्कत वादी क्र. १ यांचे एकटयांचे मालकीची नाही. तसेच दावा अर्जी

Assistant Superintendent

कलम १ मध्ये नमुद केलेल्या मिळकतीपैकी अ.न. ३ ची मिळकत वादी क्र. ३ यांचे एकटयांचे मालकीची नाही. तसेच दावा अर्जी कलम १ मध्ये नमुद केलेल्या मिळकतीपैकी अ.न. ४ ची मिळकत वादी क्र. ४ यांचे एकटयांचे मालकीची नाही. तसेच दावा अर्जी कलम १ मध्ये नमुद केलेल्या मिळकतीपैकी अ.न. ५ व ६ ची मिळकत वादी क्र. ५ व ६ यांचे एकटयांचे मालकीची नाही. सदरील दाव्यामध्ये वादी यांनी दावा मिळकती मधील सहहिस्सेदारांना या कामी आवश्यक पक्षकार केलेले नसलेने वादीच्या सदरील दाव्यास नॉन जॉईडर ऑफ नेससरीज पार्टीज या तत्वाचा बाध येत असलेने देखील वादीचा सदरचा मनाई अर्ज खर्चासह नामंजुर करणेत यावा.

४. वादी यांनी त्यांचे मनाई अर्जी कलम २ मध्ये नमुद केलेला मजकुर साफ खोटा व चुकीचा असुन सदरील मजकुर प्र. वादी यांना मान्य व कबुल नाही. तसेच दावा मिळकत अ.क्र. १, ३ ते ६ या गट क्रमांकामध्ये वादी यांचे एकटयांचे नावे दाव्यामध्ये नमुद केलेले स्वतंत्र असे क्षेत्र नसलेने वादी यांना प्र. वादी यांचे विरुध्द सदरचा दावा दाखल करणेचा कोणताही कायदेशिर हक्क नाही. त्याकारणाने वादीचा सदरचा मनाई अर्ज खर्चासह नामंजुर करणेत यावा.

५. मौजे सरवडे ता. राधानगरी जि. कोल्हापुर येथील तेली पाणंद पासुन ओढया पर्यत येणेजाणेसाठी पुर्वी गट क्र.१९९०,१९८७,१९८६,१९८५,१९८४, १९८३, २०७५, २०७४,२०७६,२०७७,२०७८,२०७९,२०८०,२०८१,२०९०,२०९१,२०९२,२०९३,२०८९, २०९४,२१४०,२१०१,२१३८,२१०६,२१०७,२१०८ व २१३९ या गट क्रमांकामधुन प्र. वादी तसेच सदरील नमुद केलेल्या गटातील शेतक-यांना येणे -जाणेसाठी दावा मिळकतीचे सरबांधावरुन पायवाट होती. सदरिल मौजे सरवडे ता. राधानगरी जि. कोल्हापुर येथील तेली पाणंद पासुन यातिल प्र.वादी तसेच अन्य शेतकरी- यांची शेती १ किलोमिटर अंतरावर असलेने सदरिल प्र.वादी व अन्य लोकांना त्यांचे जामिनीमध्ये पिके घेणे अडचणीचे झालेले होते. त्यामुळे यातिल प्र.वादी व अन्य लोकांची मिळून जवळजवळ ५० एकरापेक्षा अधिक जामिनीमधील पिकांची डोक्यावरुन ने -आण करणे तसेच पिकांची मशागत करणे प्र. वादी व अन्य शेतकरी यांना अडचणीचे ठरत होते. त्याकारणाणे यातिल प्र.वादी व अन्य शेतकरी यांनी दावा मिळकतीपासून पश्चिम बाजुस १ किलोमिटर अंतरापर्यत १२ फुट रुंदीचा रस्ता पिकांची ने -आण करणेकरिता तसेच सदरिल शेत जमिनीमध्ये पिके करणेकरिता केलेला होता व आहे.

Assistant Suprintendent

६. मौजे सरवडे ता. राधानगरी जि. कोल्हापुर येथील तेली पाणंद रस्त्यास लागुन पश्चिम बाजुस गट क्र. १९९० मधील शेत मिळ्कत असुन सदरील गट क्र. १९९० पश्चिम बाजुस वादी व अन्य यांचे नावे असलेले गट क्रमांक आहेत.

७. मौजे सरवडे ता. राधानगरी जि. कोल्हापुर येथील तेली पाणंद रस्त्यास लागुन पश्चिम बाजुस गट क्र. १९९० मधील शेतक-यांनी प्र. वादी तसेच अन्य शेतक-यांना तेली पाणंद पासुन ओढया पर्यत येणे - जाणेसाठी आवश्यक असणारा १२ फुट रुंदीचा रस्ता सोडलेला आहे. तसेच दावा मिळ्कतीचे पश्चिम बाजुचे शेतक-यांनी देखिल तेली पाणंद पासुन ओढया पर्यत येणे - जाणेसाठी आवश्यक असणारा १२ फुट रुंदीचा १ किलोमीटर रस्ता सोडलेला आहे. दावा मिळ्कतीचे पुर्व बाजुस तसेच दावा मिळ्कतीचे पश्चिम बाजुस १२ फुट रुंदीचा रस्ता तयार होता व आहे.

८. यातील वादी यांनी दावा मिळ्कतीमधुन १२ फुट रुंदीने तसेच दावा मिळ्कतीचे पूर्व पश्चिम हद्दीपर्यतचा लांबीचा रस्ता प्र. वादी व अन्य शेतकऱ्यांना तेली पाणंद ते ओढयापर्यत येणे - जाणेसाठी रस्ता सोडणेस नकार दिलेने यातिल प्र.वादी यांनी मा. तहसिलदार सो यांचेकडे रस्ता मागणी अर्ज दाखल केलेला होता. सदरिल कामी मा. तहसिलदार सो. यांनी जागेवर येवुन स्थळ पहाणी करुन तसेच यातिल वादी व प्र. वादी यांना योग्य ती संधी देवून तसेच तहसिलदार सो. यांनी गुणदोषावर काम चालवून ता. २२/१२/२०२५ इ. रोजी आदेश केलेला आहे. सदरील आदेशामध्ये मा. तहसिलदार सो राधानगरी यांनी मौजे सरवडे ता. राधानगरी जि. कोल्हापुर येथील ओढा ते तेली पाणंद यांना जोडणारा आणि गट क्र. १९९०,१९८७, १९८६, १९८५, १९८४, १९८३,२०७५,२०७४, २०७६, २०७७, २०७८, २०७९, २०८०, २०८१, २०९०, २०९१,२०९२, २०९३, २०८९, २०९४, २१४०, २१०१, २१३८, २१०६, २१०७, २१०८ व २१३९ या गट नंबर मधुन जाणारा व तयार होणारा नविन रस्ता मंजुर केलेला आहे. तसेच सदरील रस्त्यास यातील वादी व अन्य शेतक-यांनी कोणताही अडथळा करणेचे नाही असे मा. तहसिलदार सो यांनी आदेशामध्ये स्पष्ट नमुद केलेले आहे. सदरील तहसिलदार सो राधानगरी यांचे आदेशाप्रमाणे मंडल अधिकारी सरवडे यांनी यातील वादी व प्र. वादी यांना ता. १२/०१/२०२६ इ. रोजी नोटीस काढुन ता. २०/०१/२०२६ इ. रोजी सदरील रस्ता खुला केला जाणार असलेने संबंधीत यातील वादी व प्र. वादी यांनी तसेच वर नमुद शेतकरी यांनी सकाळी ११ बाजता उपस्थित राहणेबाबत

Assistant Superintendent

कळविलेले होते. त्यानंतर मंडल अधिकारी सरवडे यांनी यातील वादी व प्र. वादी यांना ता. १९/०१/२०२६ इ. रोजी पुन्हा नोटीस काडुन ता. २०/०१/२०२६ इ. रोजी सदरील रस्ता खुला केला जाणार होता. परंतु निवडणुक कामकाज सुरु असलेने सदरील रस्ता खुला करणेची पुढील तारीख कळविणेत येईल असे वादी व प्र. वादी यांना नोटीसीने कळविलेले आहे.

९. त्यानंतर यातील प्र. वादी व अन्य शेतकरी यांनी ता.०७/०२/२०२६ इ. रोजी दावा मिळकतीमधुन १२ फुट रुंदीने तसेच दावा मिळकतीचे पूर्व पश्चिम हद्दीपर्यंतचा लांबीचा रस्ता प्र. वादी व अन्य शेतकरी यांना तेली पाणंद ते ओढयापर्यंत येणे - जाणेसाठी रस्ता खुला केलेला आहे. त्याकारणाने मा. तहसिलदार सो राधानगरी यांचे आदेशाप्रमाणेचा मौजे सरवडे ता. राधानगरी जि. कोल्हापुर येथील ओढा ते तेली पाणंद यांना जोडणारा आणि गट क्र. १९९०, १९८७, १९८६, १९८५, १९८४, १९८३, २०७५, २०७४, २०७६, २०७७, २०७८, २०७९, २०८०, २०८१, २०९०, २०९१, २०९२, २०९३, २०८९, २०९४, २१४०, २१०१, २१३८, २१०६, २१०७, २१०८ व २१३९ या गट नंबर मधुन जाणरा व तयार होणारा नविन रस्ता पुर्ण झालेला आहे. सदरील रस्त्यामधुन प्र. वादी व अन्य शेतक-यांनी वहीवाट चालु केलेली आहे. त्याकारणाने वादीचा सदरील मनाई अर्ज निष्फळ झालेला आहे. सबब वादीचा मनाई अर्ज नामंजुर करणेत यावा.

१०. वादी यांनी त्यांचे मनाई अर्जी कलम ३ मध्ये नमुद केलेला मजकुर "सदर वादीचे मालकीचे क्षेत्रामधून कधीही वहीवाटीचा रस्ता आस्तित्वात नव्हता व नाही तसेच प्रतिवादी यांनी मे. तहसिलदार सो. राधानगरी यांचेकडे क्रमांक /जमिन /कवि ३२५ /२०२५ हा अर्ज रस्ता मागणी करीता दाखल केलेला होता." हा मजकुर साफ खोटा व चुकीचा असुन सदरील मजकुर प्र. वादी यांना मान्य व कबुल नाही. यातील प्र. वादी यांनी तहसिलदार सो यांचेकडे आर.टी.एस./रस्ता मागणी १४३/एस आर- ०४/२०२५ हा अर्ज दाखल केलेला होता. सदरील अर्ज मा. तहसिलदार यांनी दि. २२.१२.२०२५ इ.रोजी प्रतिवादी यांचा अर्ज मंजुर केलेला आहे.

११. वादी यांनी त्यांचे मनाई अर्जी कलम ४ मध्ये नमुद केलेला मजकुर साफ खोटा व चुकीचा असुन सदरील मजकुर प्र. वादी यांना मान्य व कबुल नाही.यातील वादी यांनी दावा मिळकतीमधुन १२ फुट रुंदीने तसेच दावा मिळकतीचे पूर्व पश्चिम

Assistant Suprintendent.

हद्दीपर्यतचा लांबीचा रस्ता प्र. वादी व अन्य शेतकऱ्यांना तेली पाणंद ते ओढयापर्यत येणे - जाणेसाठी रस्ता सोडणेस नकार दिलेने यातिल प्र.वादी यांनी मा. तहसिलदार सो यांचेकडे रस्ता मागणी अर्ज दाखल केलेला हेता. सदरिल कामी मा. तहसिलदार सो. यांनी जागेवर येवुन स्थळ पहाणी करुन तसेच यातिल वादी व प्र. वादी यांना योग्य ती संधी देवून तसेच तहसिलदार सो. यांनी गुणदोषावर काम चालवून ता. २२/१२/२०२५ इ. रोजी आदेश केलेला आहे. त्याकारणाने सदर प्रतिवादीचे अर्जातील कथनाप्रमाणे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम मधील तरतूदी लागू होतात. यातील वादी यांना तहसिलदार राधानगरी यांनी योग्य ती संधी दिलेली असलेने तहसिलदार यांनी कायदयातील तरतुदीकडे डोळेझाकपणा केलेला नाही. तसेच तहसिलदार यांना असलेल्या अधिकाराचे अधारे सरबांधावरुन रस्ता देणेचा अधिकार तहसिलदार यांना अधिकार आहे. तसेच यातील वादी व अन्य शेतकरी यांना पर्ययी रस्ता नसलेची खात्री व चौकशी करुन तसेच स्वतः तहसिलदार सो यांनी स्थळपाहणी करुन न्यायनिवाडा केलेला आहे. त्याकारणाने वादीचा मनाई अर्ज नामंजुर करणेत यावा.

१२. वादी यांनी त्यांचे मनाई अर्जी कलम ५ मध्ये नमुद केलेला मजकुर साफ खोटा व चुकीचा असुन सदरील मजकुर प्र. वादी यांना मान्य व कबुल नाही प्रतिवादी नं. १ यांचे मालकीचे क्षेत्राला लागून १५० मीटर अंतरावर जुना वहीवाटीचा ३३ फुट रस्ता अस्तित्वात नाही. तसेच शेताजवळ कासारपूतळे गावाकडून आलेला रस्ता त्यांचे शेतातील ओढया जवळून गेलेला नाही. तसेच प्रतिवादी नं. १ यांचे शेतातून नकाशास नोंद असलेला रस्ता गेलेला नाही. तसेच प्रतिवादी नं. २ ते ५ यांचे शेतालगत १५ मीटर अंतरावर नकाशास नोंद असलेला अन्य रस्ता आस्तित्वात नाही. प्रतिवादी यांना पर्यायी व पुरक असा रस्ता उपलब्ध नाही. मा. तहसिलदार सो. यांनी वादी व प्रतिवादी यांना योग्य ती संधी देवून तसेच तहसिलदार सो. यांनी गुणदोषावर काम चालवून ता. २२/१२/२०२५ इ. रोजी आदेश केलेला आहे. त्याकारणाने वादीचा मनाई अर्ज नामंजुर करणेत यावा.

१३. वादी यांनी त्यांचे मनाई अर्जी कलम ६ मध्ये नमुद केलेला मजकुर साफ खोटा व चुकीचा असुन सदरील मजकुर प्र. वादी यांना मान्य व कबुल नाही मा. तहसिलदार यांचेकडे असले अर्जाचे कामी वस्तुस्थिती पाहाणीमध्ये पर्यायी रस्ते उपलब्ध असलेली कोणतीही बाब समोर आलेली नाही. त्याकारणाने तहसिलदार यांनी

Assistant Supdintendent

त्यांनी त्यांचे निवाडयामध्ये एक अवाक्षर देखील नमुद करणेचा प्रश्नच येत नाही. तहसिलदार यांनी महत्वाच्या पूराव्याकडे डोळेझाकपणा केलेला नाही. त्याकारणाने वादीचा मनाई अर्ज नामंजुर करणेत यावा.

१४. वादी यांनी त्यांचे मनाई अर्जी कलम ७ मध्ये नमुद केलेला मजकुर साफ खोटा व चुकीचा असुन सदरील मजकुर प्र. वादी यांना मान्य व कबुल नाही.यातील प्र. वादी व अन्य शेतकरी यांनी दावा मिळकतीमधुन १२ फुट रुंदीने तसेच दावा मिळकतीचे पूर्व पश्चिम हद्दीपर्यंतचा लांबीचा रस्ता ता.०७/०२/२०२६ इ.रोजी प्र. वादी व अन्य शेतकरी यांना तेली पाणंद ते ओढयापर्यंत येणे -जाणेसाठी रस्ता खुला केलेला आहे. त्याकारणाने मा. तहसिलदार सो राधानगरी यांचे आदेशा प्रमाणेचा मौजे सरवडे ता. राधानगरी जि. कोल्हापुर येथील ओढा ते तेली पाणंद यांना जोडणारा आणि गट क्र.१९९०,१९८७, १९८६, १९८५, १९८४, १९८३,२०७५,२०७४, २०७६, २०७७, २०७८, २०७९, २०८०, २०८१, २०९०, २०९१,२०९२, २०९३, २०८९, २०९४, २१४०, २१०१, २१३८, २१०६, २१०७, २१०८ व २१३९ या गट नंबर मधुन जाणरा व तयार होणारा नविन रस्ता पुर्ण झालेला आहे. सदरील रस्त्यामधुन प्र. वादी व अन्य शेतकऱ्यांनी वहीवाट चालु केलेली आहे. त्याकारणाने वादींचे मिळकतीमधुन रस्ता पुर्ण झालेला आहे. सदरील रस्त्यास महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम कलम १४३ मधील तरतूदी लागू होतात. तसेंच मा. तहसिलदार सो. यांनी जागेवर येवुन स्थळ पहाणी करुन तसेच यातिल वादी व प्र. वादी यांना योग्य ती संधी देवून तसेच तहसिलदार सो. यांनी गुणदोषावर काम चालवून ता. २२/१२/२०२५ इ. रोजी आदेश केलेला आहे. वादीचे सिव्हील राईट बाधीत झालेले नसलेने त्याबाबत काम चालविणेचा अधिकार हा दिवाणी न्यायालयास असणेचा प्रश्नच येत नाही. तहसिलदार यांनी अधिकारांचा कायदेशिर वापर करुन दि. २२.१२.२०२५ इ.रोजीचा केलेला आर.टी.एस./रस्ता मागणी १४३/एस आर- ०४/२०२५ मधील आदेश हा कायदेशीर असा आहे. त्याकारणाने वादीचा मनाई अर्ज नामंजुर करणेत यावा.

१५. वादी यांनी त्यांचे मनाई अर्जी कलम ८ मध्ये नमुद केलेला मजकुर साफ खोटा व चुकीचा असुन सदरील मजकुर प्र. वादी यांना मान्य व कबुल नाही मा. तहसिलदार यांनी कायदेशिर असा आदेश पारीत केलेला आहे. सदरील आदेशाचे अधारे यातील प्र. वादी व अन्य शेतकरी यांनी दावा मिळकतीमधुन १२ फुट रुंदीने

Assistant Suprintendent

तसेच दावा मिळकतीचे पूर्व पश्चिम हद्दीपर्यतचा लांबीचा रस्ता प्र. वादी व अन्य शेतकरी यांना तेली पाणंद ते ओढयापर्यंत येणे - जाणेसाठी रस्ता ता.०७/०२/२०२६ इ. रोजी खुला केलेला आहे. त्याकारणाने मा. तहसिलदार सो राधानगरी यांचे आदेशा प्रमाणेचा मौजे सरवडे ता. राधानगरी जि. कोल्हापुर येथील ओढा ते तेली पाणंद यांना जोडणारा आणि गट क्र. १९९०,१९८७, १९८६, १९८५, १९८४, १९८३,२०७५,२०७४, २०७६, २०७७, २०७८, २०७९, २०८०, २०८१, २०९०, २०९१,२०९२, २०९३, २०८९, २०९४, २१४०, २१०१,२१३८, २१०६, २१०७, २१०८ व २१३९ या गट नंबर मधुन जाणरा व तयार होणारा नविन रस्ता पुर्ण झालेला आहे. सदरील रस्त्यामधुन प्र. वादी व अन्य शेतक-यांनी वहीवाट चालु केलेली आहे. त्याकारणाने वादीचा मनाई अर्ज निष्फळ झालेला आहे. प्रतिवादीनी कोणतेही बेकायेदेशीर व अनाधिकाराचे कृत्य केलेले नाही.

१६. वादी यांनी त्यांचे मनाई अर्जी कलम ९ मध्ये नमुद केलेला मजकुर साफ खोटा व चुकीचा असुन सदरील मजकुर प्र. वादी यांना मान्य व कबुल नाही प्रस्तुत प्रतिवादी यांनी कोणतेही बेकायदेशीर कृत्य केलेले नाही. तसेच " वर कलम १ मध्ये नमूद मिळकतीबाबत मा.तहसिलदार राधानगरी यांनी आर.टी.एस./रस्ता मागणी १४३/एस आर- ०४/२०२५ चे कामी दि. २२.१२.२०२५ इ रोजी दिलेला आदेश कायदेशिर असा असलेने तसेच तहसिलदार यांचे आदेशािवरुध्द मा. उपविभागिय अधिकारी यांचेकडे अपिल करुन दाद मागणेची वादी यांना संधी असतांना देखिल वादी यांनी सदरील दावा अधिकारबाहय असा मे. कोर्टात दाखल केलेला आहे. त्याकारणाने वादीचा सदरील मनाई अर्ज नामंजुर करणेत यावा. दावा मिळकतीमधुन रस्ता पुर्ण झालेला आहे. त्याकारणाने वादीला प्र. वादी यांचे विरुध्द कोणतीही मनाई मागणेचा अधिकार नाही. प्रस्तूतचा दावा दाखल करणेस वादीस कोणतेही कारण घडलेले नाही.

१७. वादी यांनी त्यांचे मनाई अर्जी कलम ९ मध्ये नमुद केलेला मजकुर साफ खोटा व चुकीचा असुन सदरील मजकुर प्र. वादी यांना मान्य व कबुल नाही मा. तहसिलदार यांनी कायदेशिर असा आदेश पारीत केलेला आहे. सदरील आदेशाचे अधारे यातील प्र. वादी व अन्य शेतकरी यांनी ता.०७/०२/२०२६ इ. रोजी दावा मिळकतीमधुन १२ फुट रुंदीने तसेच दावा मिळकतीचे पूर्व पश्चिम

Assistant Suprintendent

हद्दीपर्यंतचा लांबीचा रस्ता प्र. वादी व अन्य शेतकरी यांना तेली पाणंद ते ओढयापर्यंत येणे - जाणेसाठी रस्ता खुला केलेला आहे. त्याकारणाने मा. तहसिलदार सो राधानगरी यांचे आदेशाप्रमाणेचा मौजे सरवडे ता. राधानगरी जि. कोल्हापुर येथील ओढा ते तेली पाणंद यांना जोडणारा आणि गट क्र. १९९०, १९८७, १९८६, १९८५, १९८४, १९८३, २०७५, २०७४, २०७६, २०७७, २०७८, २०७९, २०८०, २०८१, २०९०, २०९१,२०९२, २०९३, २०८९, २०९४, २१४०,२१०१, २१३८, २१०६, २१०७, २१०८ व २१३९ या गट नंबर मधुन जाणरा व तयार होणारा नविन रस्ता पुर्ण झालेला आहे. सदरील रस्त्यामधुन प्र. वादी व अन्य शेतक-यांनी वहीवाट चालु केलेली आहे. त्याकारणाने वादीस प्र. वादी यांचे विरुध्द कोणतीही मनाई मागणेचा अधिकार नाही. तसेच सदरील रस्त्याचा वापर वादी व प्र. वादी व अन्य शेतक-यांना होणार असलेने वादीचे कायदेशीर हक्क डावलले जाणेचा प्रश्नच येत नाही. तसेच वादीचे कांहींही नुकसान होणेचा प्रश्नच येत नाही त्या कारणाने प्र. वादी विरुध्द कोणताही तुर्तातुर्त मनाई आदेश मागणेचा वादी यांना अधिकार नाही.

१८. वादी हे खेकटेखोर इसम आहेत. केवळ प्र. वादींना त्रास देणेच्या दृष्ट हेतुने व तसेच तेली पाणंद पासुन ओढयाकडे जाणार १२ फुट रुंदीचा असणारा १ किलोमिटर लांबिचा कायमस्वरुपी रस्ता बंद करुन प्र. वादी यांचेकडुन पैसे उकळणेच्या दृष्ट हेतुने वादीनी प्र. वादी विरुध्द सदरचा दावा व मनाईचा दाखल केलेला असलेने सदरचा दावा व मनाई अर्ज नामंजुर करणेत यावा.

१९. सदरील कामी प्र. वादी यांचे विरुध्द मनाई ताकीद न झालेस वादी यांचे कांहींही नुकसान होणेचा संभव देखील नाही.

२०. याऊलट सदरील कामी प्र. वादी यांचे विरुध्द मनाई आदेश झालेस यातील प्र.वादी यांचे अतोनात असे नुकसान होणार असुन वादी हे मौजे सरवडे ता. राधानगरी जि. कोल्हापुर येथील ओढा ते तेली पाणंद यांना जोडणारा आणि गट क्र. १९९०,१९८७, १९८६, १९८५, १९८४, १९८३,२०७५,२०७४, २०७६, २०७७, २०७८, २०७९, २०८०, २०८१, २०९०, २०९१,२०९२, २०९३, २०८९, २०९४, २१४०, २१०१, २१३८, २१०६, २१०७, २१०८ व २१३९ मधुन जाणारा १२ फुट रुंदीचे व १ किलोमिटर लांबीचे रस्त्यामधुन प्र. वादी व अन्य शेतकरी जात

Assistant Suprintendent

असतांना यातील वादी हे येणे जाणेसाठी हरकत व अडथळा करणेची दाट शक्यता आहे. तसेच वादी हे सदरचा १२ फुटी रुंदीचा रस्ता बेकायदेशिरपणे बंद करणेची दाट शक्यता आहे. तसे झालेस यातील प्र. वादी यांचे अतोनात असे नुकसान होणार असुन प्र. वादी यांचे कायदेशिर हक्क डावलले जाणार आहेत.

२१. वादीस सकृत दर्शनी केस नाही.

२२. बॅलन्स ऑफ कन्हीनीयन्स वादीचे बाजुने नसुन प्र. वादी यांचे बाजुने आहे.

<u>**२३. सबब प्र. वादी यांची नम्र विनंती की,**</u>

अ) वादीचा मनाई अर्ज खर्चासह नामंजुर करणेत यावा.

ब) इतर न्यायाच्या अनुषंगीक दादी याच कामी व्हावेत.

क) प्रतिवादींचा कोर्ट खर्च वादीकडुन वसुल होवुन मिळावा.

ड) जरुर तर म्हणणे दुरुस्त करणेस परवानगी असावी

------------------------

येणे प्रमाणे म्हणणे असे.

राधनगरी

ता. १०/०२/२०२६

स.नि.डा.हा.आं.श्री./सौ. ...... यांचा असे दस्तूर

**<u>प्रतिज्ञा</u>**

आम्ही यातील प्रतिवादी सत्य शपथेवर प्रतिज्ञा करतो की, वरील म्हणण्यातील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजूती प्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा आज मुा राधनगरी

ता. १०/०२/२०२६

स.नि.डा.हा.आं.श्री./सौ. ...... यांचा असे दस्तूर

Assistant Superintendent

## ॲफिडेव्हीट

मी यातील प्रतिवादी क्र. ४ **श्री. शंकर दत्तात्रय पाटील** व.व. ४७, धंदा - शेती, रा. सरवडे ता. राधानगरी, जि. कोल्हापूर, देवाचे शपथेवर कथन करतो की, वरील म्हणण्यामधिल संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजूती प्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केले ॲफिडेव्हीट आज मुा राधनगरी

ता. १०/०२/२०२६

**ॲफिडेव्हीट करणार यांना मी ओळखतो**

**(ॲड. एस. पी. वागवेकर)**

## प्रतिज्ञा

मी यातील प्रतिवादी क्र. ४ **श्री. शंकर दत्तात्रय पाटील** व.व. ४७, धंदा - शेती, रा. सरवडे ता. राधानगरी, जि. कोल्हापूर, सत्य शपथेवर प्रतिज्ञा करतो की, वरील म्हणणे व ॲफिडेव्हीट मधील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजूती प्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा आज मुा राधनगरी

ता. १०/०२/२०२६

Solemnly Affirmed before me by
Shri./Smt. Shankar Dattatray Patil
Age 47 Occu. Agri
of Sarwade, Tal. Radhanagari
Who identified by Shri./Smt. S.P. Wagvekar.
Adv. Whom I Know personally
Dated 10/2/2026

Assistant Superintendent